## xx प्रकरण चौथे xx

## ।। "अंधारबन" मधील कवितेचे स्वरूप ।।

# ::: प्रकरण चौथे :::

## xxx "अंधारबन" मधील कवितांचे स्वरूप xxx

पाठीमागील प्रकरणात आपण राम गोसावी यांच्या 'डोळे' या काव्यसंग्रहाचा अभ्यास केला, आता आपल्याला त्यांच्या दुस-या 'अंधारबन' या काव्यसंग्रहाचा अभ्यास करावयाचा आहे. हा संग्रह १९८० मध्ये प्रकाशित झाला. या संग्रहाच्या प्रकाशनामागे 'विशाखा' प्रकाशनाने दाखविलेली आपुलकी गोसावींना मोलाची वाटते. त्यात एकूण ७६ कवितांचा समावेश आहे. अशा कवितांच्या माध्यमातून, झगडण्याच्या, घट्ट पाय रोवून उभे राहण्याच्या सामर्थ्यावरच राम गोसावी यांनी आजवर उत्कट जगणे मान्य केले आहे. १९६५ मध्ये गोसावींची दृष्टी मंद झाली, त्याबद्दलची तक्रार व खंत 'डोळे' मधील कवितांमध्ये दिसते. तर 'अंधारबन' मध्ये त्या अखंड काळोखाचा स्वीकार केल्याची भावना प्रकट होते. 'डोळे' या संग्रहात कवीने आपले अंधारमय जीवन अनेक कवितांतून समर्थपणे उभे केले आहे, तसेच 'अंधारबन' मध्येही आढळते. अंधाराच्या डोहातील काळोखाची गाणी गात असतानाच कवीची कविता प्रकाशोन्मुख झाली. याची प्रचिती 'अंधारबन' वाचताना येते. ही हालचाल अंधारबनातील असली तरी प्रकाशाच्या दिशेने आहे. डोळ्याचे 'निळे पंख' गेल्यावर कवीच्या डोळ्यात ताटातूटी दाटलेली आहे. अंधारभरल्या अनुभवविश्वाने त्यांच्या जीवनात काळोखी आणलेली नाही, उलट काळोखाचीच कितीतरी कवाडं त्यांच्यासाठी खुली झाली. अंधत्वाच्या दुःखाचा एकच स्थायीभाव दूर सारून अंधारबनातील कविता ही विविध रूप घेऊन येते. ती मुक्त होऊन जीवनातील इतर भावानुभवांचा वेध घेते. हा त्यांचा काव्यसंग्रह मराठी काव्याच्या रसिक वर्गाला देखील दिलेली अमूल्य देणगी होय. त्यात शोककविता, प्रेमकविता, निसर्गकविता, सामाजिक, भक्तिपर, बालकविता, सच्चा, सांकेतिक इ. कविता आहेत. या कवितांचे वर्गीकरण खालील प्रमाणे करता येईल.

१) "अंधारबन" मधील कवितांचे वर्गीकरण -

अ) शोककविता -

'मिटले हे नेत्र जरी' 'एक क्षण नको नकोसा' 'डोळे फितुर झाले' 'काळोखला किनारा' 'या मऊ रेशमी हिरवळीवर' 'स्पर्श' 'अंधाराचे ओझे' 'शतपावली' 'डोहाकाठी' 'नायगील कारे' 'धडधडती गाडी' 'जळत्या उन्हात' 'नको नको मित्रानो' 'निष्पर्ण या फांदीवरती' 'लेक चालली सासरी' 'या मनात' 'आठवणी कोंशियाच्या' 'दुपार' 'त्या घनदाट जंगलात' 'आयुष्यभर' 'आधार सापडेना' या कविता दु:खाच्या आहेत.

'मिटले हे नेत्र जरी' या कवितेत कवीने आपल्या अंधत्वाची जाणीव असूनही त्यावर मात करून उमेदीने आपले जीवन जगणारी ही कविता दिसते. कवी म्हणतो -

"मिटले हे नेत्र जरी
मोहरले विश्व नवे
लवलवत्या पंखाना
उलगडले गगन नवे" १

या उलगडलेल्या अनुभवविश्वाने त्यांना तमभरल्या राउळात लक्ष लक्ष दिवे लावण्याचे विलक्षण भावबळ दिले. जीवनातील दु:खातता बाजूला सारून जगण्याचे सामर्थ्य या कवितेमध्ये दिसते.

'एक क्षण नको नकोसा' ही कटु वास्तवाला भिडलेली हृदयस्पर्शी भावकविता आहे. घरी अंधारमग्न, आगतिक एकाकी असा तो कवी पत्नीची वाट बघत असतो ती थकून भागून घरी येते आणि हॉस्पिटलमधील डेटॉलच्या वासासारखा तिचा विश्वास साऱ्या खोलीत भरून राहतो आणि काळीज कुरतडणारा एक नकोसा झालेला क्षण जडपणे तरंगतो. कवीही मुकाट आणि तीही मुकाट. कवीचे खरे भावबळ या कवितेमध्ये सामावल्याचे मनाला दृढतेने जाणवते.

'या मऊ रेशमी हिरवळीवर' या कवितेत प्रथम अथांग सागराचे वर्णन आहे. त्याच्याभोवती फिरणारे लोक फेरीवाले, पोरेबाळे अशा आनंदी उत्साहाने डोळ्याचे पारणे फेडणारे हे वातावरण आहे. कवी मात्र उदास होऊन म्हणतो माझ्यासाठी फक्त ही मऊ रेशमी हिरवळ हाताला, तळव्यांना, मानेला स्पर्श करणारी कवीला सुखावून टाकते. मऊ ओलसर पानांतून पाझरणारा गारवा पाठीच्या मणक्यात, मेंदूत, रक्तात, अंधार देहात, मनात काठोकाठ अपरंपार भरत राहिला आहे.

'स्पर्श' या कवितेमध्ये काळाच्या अस्तित्वाचा, एकाकीपणाचा संबंध कवीने स्वतःच्या अस्तित्वाशी मोठ्या कल्पकतेने जोडला आहे. म्हणून कवी म्हणतो -

"बुडाली अंधारी
देहाची शिरडी
बांधावी तिरडी
प्रकाशात
माझिया पिंडाशी
लुचला काळा
तोही हो आंधळा
स्पर्श मात्र -" २

'अंधाराचे ओझे' या कवितेत कवीला अंधाराचे ओझे झाले आहे. ते ओझे पाठीला बांधून कवी एकटा उपाशी चालला आहे. त्याला प्रकाशाची भूक लागली आहे. म्हणून व्याकुळ होऊन कवी म्हणतो -

"वाट गे माये
प्रकाशाची कोर
दारी उभे पोर
व्याकूळ" ३

"नक्षत्रावाचोनी
नभा नोहे अर्थ

आयुष्य हे व्यर्थ
दृष्टीवीण" ४

असे दीन उद्‌गार या कवितेमध्ये दिसतात.

'शतपावली' या कवितेमध्ये डोळे जेव्हा निघून जातात, तेव्हा सारे आयुष्य पोरक्या पोरासारखे कावरेबावरे होते आणि पाउले सुजाण होतात. ती चालत चालत राहतात उलट सुलट थकून न थकल्यासारखी फक्त फिरत राहतात. असे दु:ख रेखाटले आहे.

'डोहाकाठी' या कवितेमध्ये स्वत:ची करुण स्थिती प्रभावी-पणे व्यक्त केली आहे. कवी स्वत:लाच एक अवघडलेली होडी, धगधगती चिता, धूसर सावली समजतो आणि म्हणतो-

"डोहाकाठी
धूसर सावली
थबकलेली
हरवल्याचा शोध
घेता घेता
स्वत:च हरवलेली," ५

'नाचशील कारे' या कवितेत निसर्गातील मोराचे वर्णन आहे. जिवलग मोरांच्या निळया पिसा-यातील लाख लाख डोळे मनोमन पाहताना त्यातही माझे दोन डोळे लपले असतील का? अशी भावकरुण कल्पना कवी-मनात तरळून जाते. आणि कवी म्हणतो -

"नाचू आपण होउनी उन्मनी
घालूनी गळयात गळा
पावसात चिंब भिजता
विसरतील जीवाच्या सा-या कळा" ६

धडधडती गाडी या कवितेत कवीने स्वत:ला बकूळ संबोधले आहे. हा बकूळ व्याकूळ होउन शहारतो -

"टपटपतो अंधार
काजळते अंगण
किती करावी शिंपण
आसवांची" ७

अशा भावार्थी शब्दामधून तीव वेदना स्पष्ट होते.

'जळत्या उन्हात' या कवितेत जळतं उन्ह म्हणजे कवीच्या जीवनातल्या अंधाराचे दु:ख आहे. कवी म्हणतो या जळत्या उन्हामध्ये पेटू दया मला, थोडया दु:खाचे चटके फटके हवेत, माझा मार्ग वेगळा, छंद आगळा. दया माया नको. सुगंधी शीतल छाया नको. एकटाच मला चालूदया. या अंधारातूनच मला जीवनाचा अर्थ कळेल आणि यातूनच सुविचार फुलेल. येथे दृष्टीविषयक पंगुत्वाची बोच हळूहळू कमी होते. मन उल्हसित बनते. वृत्ती धीट बनते. तेव्हा कवी म्हणतो -

"वादू दया मजभोवती, गर्द काळा अंधार
होऊ दया मला, दु:खानी बेजार" ८

'नको नको मित्रांनो' या कवितेमध्ये अशीच वेदना प्रकट झाली आहे. कवी म्हणतो -

"वाळवंटात वणवणारा
मी एक कलंदर प्राणी" ९

अशी आत्मविश्वासाची, मनोधैर्याची गाणी गाताना दिसतो.

'निष्पर्ण या फांदीवरती' या कवितेत कवी आशावादी आहे. तो म्हणतो -

"निष्पर्ण या फांदीवरती
हा पक्षी राहील झुलत
काजळकाळया डोहाकाठी
ही बाग राहील फुलत" १०

असा आशावाद नवी प्रेरणा देताना दिसतो.

'लेक चालली सासरी' या कवितेमध्ये सासरी जाणा-या लेकीची अवघडलेली जड पावलेही कवीमनात जड होऊन उमटतात. कवी म्हणतो-

"लेक चालली सासरी
अवघडे घरदार
माउलीच्या पायाखाली
भूमी फिरे चक्राकार" ११

'त्या घनदाट जंगलात' या कवितेत हिरव्या गर्द गवतावर आभाळाची निळाई निरखीत स्वत:ला घनदाट जंगलात झोकून दयावे असे कवीला वाटते. म्हणून कवी म्हणतो -

"पुन्हा एकदा त्या घनदाट जंगलात
झोकून दयावे स्वत:ला
हिरव्या गर्द गवतावर
निरखावी आभाळाची निळाई
गर्द हिरव्या पर्णराशीतून झिरपणारी" १२

'आयुष्यभर' ही कविता कवीच्या स्वत:च्या जीवनाच्या अनुभवाची आहे. कवी म्हणतो आपला दोष नसताना सुद्धा दैवाने आपल्याला दु:खात का लोटावे? म्हणून कवी म्हणतो -

"आणि कसा कोणास ठाऊक
अचानक कोसळलो या खोल अंधारदरीत." १३

असे दु:ख व्यक्त झाले आहे.

'डोळे फितुर झाले' 'काळोखला किनारा' 'या मनात आठवणी कॅशियाच्या' 'दुपार' 'आधार सापडेना' या सर्व कवितांतून असेच दु:ख व्यक्त केले आहे.

वैशिष्ठ्ये -

राम गोसावी यांच्या शोककवितेतील चित्रे हृदय भरुन येण्यासारखी आहेत. ही गीते अंधारातील असली तरी प्रकाशाची वाट दाखवतात.

त्यामुळेच कवीला जगण्याचे बळ आले आहे. चैतन्य शक्तीस्थान लाभलेले आहे. या आत्मलक्षी कविता आहेत. त्यांना दृष्टीहीनतेचा स्थायीभाव लाभलेला आहे. मुक्तछंदात तो प्रकटला आहे. लयबद्धता, उत्कट भावना, तरलता, गेयता मितभाषी व संयत अल्पाक्षरत्व हे या कवितेचे एक अंगभूत वैशिष्ठ्य आहे. सहज प्रवाही आणि प्रासादिक भाषा, उत्कट भावाशय मोजक्याच प्रतिमांनी, ही करुण गीते मनाला आनंद देतात. कारण भाव व्यक्त करतात, तरीही उत्साहाची, धीरवृत्तीची गाणी कंटकमय जीवन आनंदाने, चोखंदळपणाने जगण्याचा मंत्र देतात. त्यांच्या अंधारयात्रेमध्ये दाखवलेली 'प्रकाशाची वाट' हे या कवितांचे मोठे हृदयंगम वैशिष्ठ्य आहे.

ब) निसर्ग कविता -

'झिमझिमणा-या धारांमधुनी' 'श्रावणपहाट'

या दोन्ही कवितांतून निसर्गाचे सुंदर वर्णन आले आहे.

'झिमझिमणा-या धारांमधुनी' या कवितेत झिमझिमणा-या धारामधूनी बसलेली शहारलेली थंड हवा त्याला कणाकणातून जाणवते, कुजबुजणा-या जललहरींचे गूजही त्याच्या कानी येते. ओल्या दुधाळ काचेवरती आकाशाचा निळा पारवा घुमतो आहे. हिरवी पाने लज्जित ओलीचिंब होतात. असे निसर्गाचे सुंदर चित्रण दिसते. कवी म्हणतो -

"झिमझिमणा-या धारांमधुनी
कूस उजळते प्रेमळ काळया भूमातेची
लाख लाख ते फुटतिल अंकूर
हसतिल क्षितिजे सोन्याची" १४

'श्रावणपहाट' या कवितेमध्ये कवीने श्रावणातल्या पहाटेचे वर्णन केले आहे. ती पहाट मेघातून निथळणारी पानाआड किलबिलणारी, पावलीत दरवळणारी, हिरवळीत मुरडणारी, जलाशी थबकणारी, रानफुलांशी लगटणारी अशी श्रावण पहाट आहे. तसीच असावी श्रावणभेट

कवी म्हणतो -

"अशी असावी श्रावणभेट
ओठाशी उगलणारी
मधात भिजणारी
बेहोषीत बुडणारी" १५

वैशिष्ठये -

या कवितांतून निसर्गाची सुंदर वर्णने केली आहेत. ही निसर्गाची सजीव चित्रे मनावर मोहिनी घालतात. त्यामुळे सजीव सुरेख वातावरणचित्रे निर्माण होतात. यातील निसर्ग कवीच्या मनाला आनंद देतो. दृष्टी हरपलेल्यामुळेच की, काय या निसर्गकवितांतून कवीच्या नाद, स्पर्श, संवेदना जाता अधिक्य तल्लखव तरल झालेल्या दिसतात. कवीचे निसर्गावर प्रेम आहे. यातील श्रावणपहाट त्याच्या मनावर मोहिनी घालते. झिमझिमणा-या धारा सुध्दा कवीला आनंद देतात. ही वैशिष्ठे या कवितांची आहेत.

क) सामाजिक कविता -

'व्यवहार सांभाळण्यासाठी' 'शून्यत्वाची थंडगार वेदना' 'दैव' या कविता सामाजिक आहेत.

'व्यवहार सांभाळण्यासाठी' या कवितेत जगात राहणा-या माणसाचे वर्णन केले आहे. व्यवहारी जगात शहाण्याला कसे मूर्ख बनावे लागते स असे परभाषेत सांगितले आहे. कवी म्हणतो -

"व्यवहार सांभाळण्यासाठी
प्रसंगी आत्माही
ठेवावा लागतो गहाण
व्यावहारिक यशाचे
एव्हरेस्ट शिखर चढताना
गोठून जातात पंचप्राण" १६

'शून्यत्वाची धेंडगार वेदना' या कवितेत समाजचित्रण दिसते. सकाळच्या वेळी लोकलमधून जाताना कवीला कळकट माणसे दिसतात. बिनधास्त विखरुन ती बसलेली असतात. आणि केव्हातरी फलाटावर आक्रोश करणारे, त्याच्या आईने वाऱ्यावर सोडलेले भुकेजलेले तान्हुले मूल कवीच्या दृष्टीस पडते. फाटक्या वस्त्रातील फाटकी पोर तिला पडलेला घोर. ही दृश्ये पाहिली की, कवीच्या काळजात कुठे तरी कळ उठून त्याची त्यालाच लाज वाटते व टेरिलीन कपडे, सोनेरी फ्रेमचा चष्मा, पार्कर पेन, इम्पोर्टेड सिगरेट लायटर हे सारे काळवंडून जाते. आणि शून्यत्वाची धेंडगार वेदना कवीच्या सर्वांगातून सरपटत जाते. आणि मनाचे वारुळ व्यापून टाकते.

'दैव' या कवितेत असेच समाजचित्रण दिसते. समाजातील माणसे कशी असतात याचे वर्णन आहे. ज्याच्या हातापायात साखळदंड जखडावेसे वाटतात त्याच्या हातात रत्नजडित राजदंड झळाळत असतो, ज्याच्या गळ्यात पडावे वाटतात हार तर त्याच्या पाठीत खुपसला जातो खंजीर. हे चित्रण बघून कवी आपल्या मरणाची वाट पहात आहे. पण त्याच्यापासून यम चार हात दूर आहे. ज्याला जीवन जगावेसे वाटते त्याला यम नेतो. म्हणून कवी म्हणतो -

"जो पाहत असतो मरणाची वाट
त्याच्यापासून यम चार हात दूर
एखादया सुकुमार फुलावर मात्र
त्याचा हात पडतो क्रूर" १७

<u>वैशिष्ठये -</u>

या कवितातून समाजचित्रण दिसते. गरिब लोकांचे जीवन रेखाटले आहे. त्यांना व्यवहारी जगात कसे जगावे लागते हे वेदनामय जीवन दिसते. त्यामुळे कवीला दु:ख होते. जगातील माणसे कशी असतात. हे दाखविले आहे. व्यवहार सांभाळण्यासाठी हलकट माणसांच्या गळ्यात घालावे लागतात हार, दांभिक दाढीवाल्यासमोर उद

जाळावा लागतो. ॠण काढून सण साजरे करावे लागतात. शेंदूर फासलेले पाषाण पूजावे लागतात. डोक्यावरुन मखमली जरतारी वहाण मिरवावी लागते, घोटाळणा-या श्वानांना दूध पाजावे लागते, मायावी कांचनमृगामागे वणवण भटकावे लागते. अशा व्यवहारी जगाचे चित्रण या सामाजिक कवितांतून दिसते. ही वैशिष्ठे दिसून येतात.

ड) <u>भक्तिपर कविता</u> -

'नियतीची काठी' 'हाती शिळी शिदोरी' 'पंढरीचा वाटेवरी' 'माझा सावळा विठ्ठल' 'व्यथेची वाळ' या कविता भक्तिपर आहेत.

'नियतीची काठी' या कवितेत कवीने तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. कवीने दैवाला दोष दिला आहे. दैवावर, परमेश्वरांवर भार टाकला आहे. कवीला वाटते कौतुक करावं की शिव्या दयाव्यात. म्हणून कवी म्हणतो -

"डोलविणारा तूच
लोळविणारा तूच
तारणारा
मारणारा तूच
तुझं कौतुक करावं की तुला शिव्या दयाव्यात
काहीसुदधा कळत नाही" १८

'हाती शिळी शिदोरी' या कवितेत कवीची दृष्टी गेल्यामुळे कवी दु:खाने टाहो फोडताना पाहून सीतेच्या वियोगाने दु:खी झालेल्या रामाची आठवण होते. परंतु तो राम विवेकाने दु:ख मागे टाकून सीता-शोधाच्या उदयोगाला लागतो. तसा हा राम सुदधा विवेकाने हळूहळू दु:ख सागर पार करतो व विवेकाला आव्हान करतो -

"ये नाविका विवेका
आता तुलाच हाका" १९

'पंढरीच्या वाटेवरी' या कवितेत पंढरीचे वर्णन केले आहे. पंढरीच्या वाटेवर गुलालाची उधळण भक्तीभाव सुमनांची गंधमय पखरण नदी नाले, राने वने आनंदून स्वागतास निरांजने दारोदारी आतुरली आहेत. आळंदीचा योगिराज पालखीत विसावला आहे. कवी म्हणतो-

"हरीनाम कीर्तनरंगी
वारकरी झाले दंग
भक्ताचिया भेटीलागी
धाव घेई पांडुरंग" २०

'माझा सावळा विठ्ठल' या कवितेते सुद्धा विठ्ठल भक्ती आढळते. अतिरिक्त सूर आळविणाऱ्या या कवितेत भक्तीभावनेची उत्कट लकेर मिसळली आहे. भक्तीची पखरण आज मोहते आणि सावळ्या विठ्ठलाचे रमही मनात भरत राहते. रोमारोमांत टाळचिपळ्याचा नाद घुमू लागतो. कवी म्हणतो -

"रोमरोमी अंकुरला
नाद टाळ चिपळ्यांचा
हृदयाच्या प्रांगणात
कुंभ डोले स्वानंदाचा" २१

'व्यथांची वाळ' या कवितेत व्यथीत मनस्थिती आळवते. व्यथांची वाळ अंगाखाद्यावर चितेचा पाषाण उभा शिरावर कवीने नारायणावर भार टाकला आहे. त्याच्या चरणांचा तो आधार शोधतो. कवी म्हणतो -

"आता नारायणा
तुझ्यावरी भार
तुझ्या चरणांचा
शोधितो आधार" २२

वैशिष्ठये -

या भक्तिपर कवितांतून भक्तीभावनेतील उत्कंटतेचा प्रत्यय

आणून दिला आहे. यातील दोन कवितातून विठ्ठल भक्ती आढळते. या दोन कवीता उल्लेखनीय आहेत. त्यात छंदोबद्ध अभंग आहेत. या कवितांतून कवीने नारायणाचा आधार घेतला आहे. विठ्ठल हे वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत आहे. त्याच्या भक्तीचे वेड कवीला आहे. विठ्ठल भक्तीने आनंद मिळतो. या विठ्ठलामुळे पंढरीला वैकुंठाचे स्वरुप आले आहे. वारकऱ्यांना आनंद मिळतो. भक्तीपुंडलिकाच्या भेटीसाठी विठ्ठल पंढरपुरास आले व ते आजतागायत विटेवर उभे राहिलेले आहेत. पंढरी हे भक्तीचे पीठ भीमा नदीच्या काठावर बसलेले आहे. भीमा नदीचा उल्लेख भागवत आणि महाभारतात आहेत. ही वैशिष्ठ्ये आहेत.

इ) प्रेमकविता -

'होसी सखा जीवाचा', 'अंधारबन,' 'साज,' 'तू तेव्हाची आताची,' 'हाती हात देताना,' 'कोरांटी,' 'भाग्य,' 'अश्विनातल्या ऐन दुपारी,' 'पाऊस झेपावतो,' 'त्रिपूरी पौर्णिमा,' 'आषाढी स्पर्श,' 'येणार तू म्हणोनी,' 'नक्षत,' 'तुझ्यामुळे.'

'होसी सखा जीवाचा' या कवितेमध्ये सर्व वैरभाव सोडून जीवाचा सखा होऊन प्रेयसिच्या मनाला भूल पाडून चंदनाचा सहवास घेत आहे. असे प्रेम व्यक्त होते.

"आलास सोबतीला
सदभाव तो जपावा
हा वेल चांदण्याचा
तवसंगती फुलावा" २३

"अंधाबन" येथे सखीला भेटण्याला प्रकाशाची मिठी आकाश स्वप्नामध्ये भेटते. काव्यातून, फूलातून अंतरीचे भाव धूंद होतात. त्यामुळे कवीला ब्रहमानंद होत आहे. कवी म्हणतो -

"पर्ण जाळीतूनी पाझरे प्रकाश
भेटले आकाश स्वप्नामाजी
पडे जीवालागी प्रकाशाची मिठी
नाचे शब्द दिठी ब्रहमानंदे" २४

'साज' ही कविता असेच प्रेम व्यक्त करते. टेकडीवर उन्हाचा साज, जललहरीवर दिव्याचा साज तर कविच्या मनात–

"मनात माझ्या गेला थरकून
साज विजेचा
तुझ्या प्रीतिचा"२५

'तू तेव्हाची', आताची' या कवितेत तू तेव्हाची, आताची यातील फरक काढला आहे. येथे पत्नीविषयक प्रेम आहे. कवीची पत्नी पहिल्यासारखी आजही आहे. कवी अंधत्वामुळे बदलला आहे. कवी म्हणतो–

"तेव्हा सारखीच तू आजही
श्यामल कोमल पहाटेची
तुझ्या सहवासात उमलतात फुले
माझ्या विझलेल्या स्वप्नांची"२६

'हाती हात देताना' या कवितेमध्ये कृतज्ञ प्रेमभाव व्यक्त होतो. कवी म्हणतो,–

"खिडकीशी चांदणे कधीचे थबकले आहे
तुझा वेडेपणा पाहण्यासाठी"२७

'कोरांटी' ही कवितासुध्दा अशीच कृतज्ञ प्रेमाची कबुलीही व्यक्त करते. कवी म्हणतो,–

"माझ्या काटेरी अस्तित्वावर
फुले कोरांटीची
तुझ्या सहवासाची"२८

'भाग्य' या कवितेमध्ये छोटया संसाराला सखीच्या आधाराचा साज हवा असतो. असे असेल तरच जीवनाला चवदारपणा येईल. ही भावना व्यक्त होते. म्हणून कवी म्हणतो,–

"भाग्य माझे इतुकेच
लाभे तुझा आधार
तुझ्यामुळेच सजलेला
माझा छोटा संसार"२९

'अश्विनातल्या ऐन दुपारी' या कवितेमध्ये अपार प्रेम दिसते. आणि कवी म्हणतो,-

"अश्विनातल्या ऐन दुपारी
निवांत सारे। तूही निकटी।
विडा माझिया ओठी लपला
रंग तुझ्या परि गालावरती"३०

'पाऊस झेपावतो' या कवितेमध्ये जीवनात प्रेमी जीवांचे उन्मनी मीलन होते हा भाव प्रकट केला आहे.

"पाऊस - प्रेमी जीवांचा
उन्मनी मीलनाचा अविष्कार
तुझ्या माझ्या अणुरेणूत
क्षणोक्षणी त्याचाच साक्षात्कार"३१

'त्रिपूरी पौर्णिमा' या कवितेमध्ये थंडीने अंग थरकत असताना परस्परांना हळूच बिलगणे असे स्वाभाविक असते. तशीच प्रेमाची रीत आहे. म्हणून कवी म्हणतो,-

"कार्तिकातल्या सुरम्य रात्री
धुंद चांदणे तुझीया नेत्री
थंडीने ग अंग थरकता
परस्परांना हळूच बिलगणे."३२

'आषाढी स्पर्श' या कवितेमध्ये हाच भाव आहे. कवी म्हणतो-

"अदृश्याची ओढ अनावर
आर्त व्यथित ही जीवनधारा
तुझ्या बिलोरी भिंगामधुनी
दिसे दूरचा स्वप्न किनारा"३३

'येणार तू म्हणोनी' या कवितेमध्ये प्रिय सखी येणार म्हणून कवी पहाट आरसून तिच्या स्वागतासाठी ओठात भावगीत तयार करतो.-

"येणार तू म्हणोनी
आरासली पहाट

तव स्वागतास सजले
ओठात भावगीत"३४

'तुझयामुळे' या कवितेतही असेच कृतज्ञ प्रेम दिसते. एखादया दुर्मिळ अनावर क्षणी कवी म्हणतो, -

"रसगंध मनी या अंकुरले
स्वर मधुरपंखी किणकिणले
तुझयामुळे ग तुझयामुळे"३५

'नकळत' मध्ये असेच प्रेम दिसते. म्हणून कवी म्हणतो, -

"कल्पलता तु माझया दारी
तुला न जाणीव कर्तृत्वाची
नाभीमधूनी कस्तूरीदरवळ
मृगास परी ना त्या दाद तयाची"३६

वैशिष्ठये -

रा म गोसावींच्या या प्रेमगीतात कृतज्ञ प्रेम समर्पकपणे व्यक्त झालेले आहे. उत्कंठतेचे भावबळ लाभले आहे. प्रणयपर भाव आहेत. या सर्वातून प्रीतीभावना दिसते. त्या मनाला आनंद देतात. या कवितां- तून जीवाशिवाची साथसंगत देणा-या प्रिय सखीबददलची अपार कृतज्ञता व तृप्ती ओसंडते आहे. या कविता हव्याहव्याशा वाटतात. आलेल्या भावरम्य क्षणप्रसंगाची वर्णनेही पुन्हा पुन्हा वाचावीत अशीच आहेत. इतर कवींची प्रेमगीते आणि या कवीची प्रेमगीते यात फरक आहे. दृष्टीहीनते- मुळे ती जास्तच कृतज्ञ झाली. ही त्यांच्या कवितांची वैशिष्ठये आहेत.

ई) बालकविता -

'वाटते अजून' या कवितेत प्रौढपण विसरुन बालपण आठवते. ताईबरोबर गाईलेली हादग्याची गाणी आठवून त्यांचे मन बाल्याकडेही ओढ घेऊ लागते. बाहुलीचे लग्न, शेजारच्या बागेतून चोरलेले कच्चे पेरु, लहानपणी भूताच्या ऐकलेल्या गोष्टी, आईच्या मांडीवर सुखे निद्राधीन, साखरेचे अंगण हे सर्व आठवते. आणि कवी म्हणतो, -

"वाटते अजून
अनुभवावे एकदाच
रम्य ते बालपण
साखरेचे अंगण
मोठेपण विसरून
प्रौढपण विसरून"३७

वैशिष्ठये:- या

या कवितेचे वैशिष्ठय असे की, कवीचे मन बालपणाकडे ओढले आहे. मनुष्याला, प्रौढत्व आलेयाची ओढ कशी लागते. त्याला रम्य बालपण खूप आवडते. त्यात आनंद मिळतो. हे बालपण एकदाच येते. हे या कवितेचे वैशिष्ठय आहे.

२)"अंधारबन" मधील आशयाचे वेगळेपण -

'अंधारबन' मधील आशयाचे वेगळेपण म्हणजे यातील कविता दु:खाच्या असल्या तरी त्या प्रकाशाच्या दिशेने जाणा-या आहेत. प्रकाशाची वाट त्यांना सापडली आहे. अंधारमय जीवन आनंदाने जगण्याचे बळ या कविता देतात, मन उल्हसित करतात. या कविता सच्च्या आहेत. सच्चा सूर सापडला आहे. हाच सच्चासूर या कवितांचे सामर्थ्य आहे. या संग्रहातील अंधाराचे दु:ख प्रकट झाले असले तरी अनेक कवितांतून या दु:खाशी आता तडजोड केली आहे. दु:खवृत्ती कमी झाल्याचे व त्यांच्याशी जुळवून घेतले पाहिजे अशी जाणीव कवीच्या मनात निर्माण झाल्याचे दिसून येते. मनाला गंभीर करणा-या अशा कवितांबरोबर प्रसन्नता व आनंद देण्याची कवितांची संख्या या संग्रहात बरीच आहे. त्यामुळे 'अंधारबन' या संग्रहाचे नांव सार्थ वाटेल.

या संग्रहात दु:खाच्या कविता असून काही सांकेतिक प्रेमकविता, निसर्गकविता या मनाला आनंद देणा-या आहेत. प्रेमकवितात प्रीतीभावना उत्कट दिसते. पती पत्नी प्रेम कृतज्ञ दिसते जीवाशिवाच्या साथसंगत

लाभणाऱ्या कविता आहेत. सखीविषयी ओढ लागलेली दिसते. निसर्ग-वर्णनाच्या कवितेतील निसर्ग मोहून टाकणारा व मनाला आनंद देणारा आहे. सामाजिक कवितांत समाजाचे चित्रण दिसते. व्यवहारी जगात शहाण्याला मूर्ख कसे बनावे लागते हे दिसते.

नियतीच्या निष्ठूर चेष्टेमुळे कवीचे चर्मचक्षू गेले खरे पण, कदाचित की काय कवीच्या काव्य प्रतिभेचे चक्षू अधिकच डोळस झाले, अधिक तेजाळले अशी वाटावी इतकी या काव्यातली वेदना क्षुब्ध व्याकूळ करणारी आहे. अंधाराच्या मनोव्यथेचे नानाविध अविष्कार येथे प्रकर्षाने प्रकट होतात. सभोवार लांबच लांब पसरलेल्या काळ्याकभिन्न निबिड अंधारगुहेतून अज्ञानाची जीवघेणी वाट तुडवितांना कवीमनाला जे दारुण क्लेश होतात त्याचीच प्रचिती येथे ठळकपणे येते. त्यादृष्टीने कवितेच भावविश्व विशिष्ठ व्यथेपुरते सीमित झालेले आढळते. तथापि हे तो प्रचितेचे बोलणे असल्याने त्या व्यथेला गडद गहिरे सूल लगटलेले आहे.

अंधत्वाची आपत्ती कोसळली म्हणून कवी येता-जाता आपल्याच दु:खाला कढ आणीत आहे असे मात्र चुकूनही कोठे जाणवत नाही. उलट या आत्मलक्षी वेदनेव्दारा कवी दृष्टीहीनतेने होरपळत, चाचपडत जगणाऱ्या समस्त अंधजनाच्या प्रातिनिधीक दु:खाला रसरसीत, धगधगते शब्दरुप देतो आहे. प्रसादाने आणि नादमाधुर्य शब्दकळेत आहे. आत्मप्रचितीच्या खोल स्पर्शामुळे सारा आशय वेगळे सुंदर रुप घेतो.

यातील आशय नेमकेपणाने उलगडून दाखवला आहे. 'अंधारबन' मधील आशयाचे स्वरुप आहे न संपणाऱ्या अपरिहार्य दु:खापोटीच जन्म घेणारी एक स्वीकारशीलता आज कवितांमध्ये निर्माण झाली आहे. परिणामी पूर्वी सातत्याने दिसणाऱ्या घायाळ भावाकुशलतेची नानाभिव्यक्तिच्या तीव्रतेने मितभाषी धारदारपणाने घेतल्याचे आज या कवितामधून जाणवते. अशासारखी भेदक अभिव्यक्ति भावाशयाला वेगळीच धार देते. आणि रसिकालाही अंतर्मुख करते.

### ३) "अंधारबन" कवितांमधील रचनाविशेष -

राम गोसावी यांच्या कवितांची प्रासादिकता ही विशेषत: आहे.

त्यात दुर्बोधता नाही. कवितांचा आकृतीबंध तरल आहे. व सोप्या प्रतिमा या कवितेत वापरल्या आहेत. या कवितातील आशयाला नेमकेपणाने उलगडून दाखवणाऱ्या आहेत. शब्दकलेत प्रसाद आहे. शब्दांत नादस्पर्श, नादमाधुर्य आहे. त्यांची रचना सोपी आहे. कुठेही ध्रुवपद नाही. छंदमय, लयबध्द रचना आहे. मुक्तछंद वापरला आहे. प्रतिमांचा वापर काव्यातील आशय उलगडण्यासाठी आहे. स्वत:चे अंधारमय जीवन प्रतिमाव्दारे प्रकट केले आहे. संवेदना तरल आहे.

त्यांच्या बहुतांश कवितेतून पहिल्या ओळीतच कवितेचे शीर्षक आहे. आणि शेवटच्या ओळीतही शीर्षक आहे. सलग ओळींच्या काही कविता आहेत तर काहीत चार चार ओळीची पाच-पाच, सहा-सहा कडवी आहेत. अशी त्यांच्या कवितांची रचना आहे.

४) "अंधारबन" मधील काव्यसौंदर्य:-

राम गोसावी यांच्या अंधारबन काव्यसंग्रहातील कवितांच्यातील काव्यसौंदर्य देखणे आहे. वाचकाला मोहून टाकण्यासारखे आहे. छंदबध्द स्वरूपात प्रकट होणारी त्यांची काव्यवाणी आहे. लयबध्द स्वरूपांत त्यातील ओळी नेमकेपणाने टिपल्या आहेत. निसर्ग सौंदर्याचे सुंदर वर्णन शब्दांशब्दांत केले आहे.
आणि.....

"लोटून देतेस स्वत:ला करकरणाऱ्या
आरामखुर्चीत एक दीर्घ नि:श्वास टाकून
हॉस्पिटलमधील डेटॉलच्या उदास
वासासारखा तुझा नि:श्वास साऱ्या खोलीत
भरून राहिलेला. तुझ्या एका शब्दासाठी
दिवसभर आसूसलेलाजीव पार कोमेजून गेलेला"३८

प्रेममय-

"आकाशाच्या नील घटातील
दूध सांडले अमृत शीतल

दूधसागरी विश्व बुडाले
भासे सुंदर स्वप्न दिवाणे·"३९

निसर्गसौंदर्य वाणी -

"झिमझिम्णा-या धारामधूनी
झाले लज्जित ओलीचिंब हिरवी पाने
वस्त्रे त्यांची फांदीवरची नेली पळवून
कोण्या कृष्णाने"४०

त्यात व्याकरणाचा वापर नाही· या कवितात निसर्ग, विरह, सौंदर्य, प्रीती या सर्वांच्यामुळे त्याचे काव्य उठून दिसते· असे काव्यसौंदर्य त्यांच्या कवितांचे आहे·

## निष्कर्ष-

'अंधारबन' मधील कवीचे भावविश्व पाहिल्यावर चटकन लक्षात येते की, 'डोळे' मधील कवीचे भावविश्व वेगळे होते· डोळे नसल्याने होणारे दु:ख 'डोळे'या संग्रहातील कवितांचा केंद्रबिंदू होता· त्यामुळें होणारी मनाची काहिली कवीला स्वत:तील मर्यादांची जाणीव अधिक करुन देत होती· आपल्या या आगतिकतेचे सूर आळविण्यात तो दंग झाला होता· त्यासाठी तो आपल्या आधाराची वाट पहात आहे· असे जाणवत होते· पत्नी आणि परमेश्वर हा आपला आधार होईल असे तो मानत होता· त्याचे अंत:चक्षु शोधीत असलेला आधार कवीला मिळेल किंवा कसे असा प्रश्न रसिक मनात 'डोळे' मधील कवितांनी निर्माण केला होता· अंधारबनातून कवीच्या भाववृत्तींचा आस्वाद घेतल्यावर कवीला हवा असलेला आधार मिळाला आहे असेच म्हणावे लागते· आलेल्या अंधत्वाच्या अंधारातूनच प्रकाशाकडे जाण्याची वाट कवीला दिसली आहे· जीवनाला व्यापून राहिलेल्या या अंधारातही बुध्दाच्या अस्थीप्रमाणे जतन करण्यासारखे काहीतरी आपल्याजवळ आहे· ही कवीमनाला झालेली जाणीव या अंधार-बनाने स्पष्ट केली आहे·

कवीची प्रकाशाकडे नेणारी ही भक्ती म्हणजेच त्याला लाभलेले प्रतिभेचे पंख होत. त्या पंखावर स्वार होऊन जन्मलेली ही कवितारूपी वाट आहे. त्या वाटेवरील म्हणजे कवितेवरील कवीची भक्ती हीच त्याची भक्ती बनली आहे. ही भक्ती चेतवणारी पत्नीची प्रीती ही त्याला तितकीच महत्वाची वाटत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे त्याला ब्रम्हानंदाची प्राप्ती झाली आहे.

=====x=====

## प्रकरण-चौथे



### xxx संदर्भ टीपा xxx

१) राम गोसावी : "अंधारबन" काव्यसंग्रह
विशाखा प्रकाशन पुणे, प्रकाशक: राजा फडणीस.
पहिली आवृत्ती : १ ऑगष्ट १९८०
पृ.१६

२) तत्रैव पृ.२४

३) तत्रैव पृ.२५

४) तत्रैव पृ.२५

५) तत्रैव पृ.२७

६) तत्रैव पृ.२८

७) तत्रैव पृ.३७

८) तत्रैव पृ.४३

९) तत्रैव पृ.४४

१०) तत्रैव पृ.४५

११) तत्रैव पृ.५०

१२) तत्रैव पृ.६०

१३) तत्रैव पृ.६१

१४) तत्रैव पृ.३३

१५) तत्रैव पृ.५६

१६) तत्रैव पृ.३१

१७) तत्रैव पृ.५९

१८) तत्रैव पृ.२९

१९) तत्रैव पृ.३८

२०) तत्रैव पृ.३९

२१) तत्रैव पृ.५१

२२) तत्रैव पृ.५२

२३) तत्रैव पृ.१५

२४) तत्रैव पृ.१९

| | |
|---|---|
| २५) तैत्रव | पृ• ३४ |
| २६) तैत्रव | पृ• ३५ |
| २७) तैत्रव | पृ• ३६ |
| २८) तैत्रव | पृ• ४० |
| २९) तैत्रव | पृ• ४१ |
| ३०) तैत्रव | पृ• ४२ |
| ३१) तैत्रव | पृ• ४६ |
| ३२) तैत्रव | पृ• ४७ |
| ३३) तैत्रव | पृ• ५४ |
| ३४) तैत्रव | पृ• ५५ |
| ३५) तैत्रव | पृ• ६४ |
| ३६) तैत्रव | पृ• ६३ |
| ३७) तैत्रव | पृ• ४८ |
| ३८) तैत्रव | पृ• १७ |
| ३९) तैत्रव | पृ• ४७ |
| ४०) तैत्रव | पृ• ३३ |

=====x=====